॥ श्री ॥

Page No.
Date: / /

iPustak लघुकथा स्पर्धेसाठी

लघुकथेचे नाव :- डुबकी

लेखकाचे नाव :- अमोल बाळाभाऊ अहेर

शब्दसंख्या :- २४६३

Scanned with CamScanner

(५)

# डूबकी

" विनू बाळा, उद्यापासून तूलाही जावं लागेल, बाबांसोबत नदीमध्ये डूबकी मारायला"

" नाही नाही आई एवढ्या गारठ्यात, त्या नदीच्या थंडगार पाण्यात मी नाही जाणार "

" बाळा हा आपला परंपरागत व्यवसाय आहे तूझे बाबा रोज नदीवर जातात लोकांनी नदीत सोडलेली मसनवट्याची राख चाळणीत घेतात ती चाचपून पाहतात त्यातून मिळेत ते पैसे अन फारच नशीब असेल तर सोन्याचा मनी असं मिळेल ते घेवून येतात त्यावरच तर आपलं घर चालतं हे तूला माहिती आहे ना बाळा!

आणि बाळा, मलाही नाही वाटत रे एवढ्या कोवळ्या वयात शिकण्यासवरण्याच्या वयात तूला नदीवर पाठवावं. मन अगदी घट्ट करुन आणि काळजावर दगड ठेवून तूला हे काम सांगतेय मी पोटच्या कोवळ्या लेकराला असं थंडी-गारठ्याचं कोणतीही आई नदीवर जायला सांगेल बाळा? तूला हे काम सांगतांना माझंही काळीज तीळ-तीळ तूटतयं बाळा "

असं बोलता बोलताच विमलचा हुंदका फूटला. आणि तिच्या डोळ्यातून अश्रु धारा वाहू लागल्या. विनू तिच्याकडे हतबलतेने असहायतेने पाहू लागला. त्याचाही कंठ काहीसा दाटून आला होता. विमलने पदराने आपले डोळे पूसले आणि पुन्हा बोलायला लागली.

" बाळा माझीही खरचं इच्छा नाही रे तूला बाबांच्या या कामावर पाठविण्याची, पण तू पाहतोस ना ही सूमी तूझी छोटी ताई कशी अंथरुणाला खिळून पडली आहे आणि कालच डॉक्टरांनी काय सांगितलं ऐकलयं ना की, एक लाख रुपये लागतील तिच्या ऑपरेशनला शिवाय हे ऑपरेशन एका वर्षाच्या आत करावं लागणार आहे. बाळा तूझे बाबा रोज नदीत डूबकी मारुन लोकांनी प्रेतावर फेकलेले पैसे गोळा करुन आणतात मीही अगरबत्त्या धूप विकून संसाराला हातभार लावते. त्यातच आजवर आपलं घर चालत होतं तूझं

सूमीचं शिक्षण चालत होतं, इथपर्यंत सगळं ठीक होत बाळा. पण आता सूमीच्या ऑपरेशनसाठी वेगळे एक लाख रुपये गोळा करायचे म्हणजे खूप अवघड आहे आपल्यासाठी. आजवरच्या सूमीच्या आजारात आजवर माझ्या अंगावरचे सगळे दागिने गेलेत. घरात कुठलीही शिल्लक पुंजी उरली नाही. त्यामुळे तूलाही थोडा हातभार लावावा लागेल विनू. 'सध्याचा सूमीचा गोळ्या औषधांचा खर्च भागवत भागवत जेंव्हा पैसे तेंव्हा जमतील तेंव्हा ऑपरेशन' असंही केलं असतं आपण पण डॉक्टरांनी ऑपरेशन एका वर्षाच्या आतच करायचं सांगितल्याने हे ओझं आता तूझ्या खांद्यावर पडतय बाळा. राहून राहून तर माझ्या मनात येतं की मीच जावं तूझ्या बाबासमवेत नदीतून पैसे गोळा करायला. तसं झालं असतं तरी तूला पाठवलं नसतं पण मला कुठे पोहता येतं. बाळा आजवर आम्हीतरी तूला कधी कोणतं काम सांगितलं आहे का? पण सूमीच्या आजारपणामुळे ही वेळ आलीये आपल्यावर. तूला पोहायला छान जमतं अन बाबा तूला पैसे शोधायच्या नेमक्या जागा दाखवतील. त्याप्रमाणे तू फक्त बाबांना त्यांच्या कामात मदत करायची आहे. त्यातून जे काय पैसे मिळत जातील ते सूमीच्या ऑपरेशन साठी मागे टाकत जावू. तो पर्यंत भागवू गोळ्या औषधांवरच. एवढं करशील ना सोन्या आपल्या छोट्या ताई साठी."

बोलतांना पुन्हा विमलचा स्वर कातर झाला होता. तिने हुंदका आतल्या आत दाबण्याचा प्रयत्न केला तरी निजलेल्या सूमीच्या डोक्यावरुन हात फिरवतांना तिचे डोळे पुन्हा पाणावलेच तिने पदर डोळ्यांना लावला.

एवढा वेळ आईपुराण शांतपणे ऐकत होणाऱ्या विनूचं मन आता त्या कामासाठी जवळजवळ तयार झालंच होतं पण तरीही एक प्रश्न होताच तो त्याने आईपुढे मांडला "ठीक आहे मी जाईन बाबांसोबत नदीवर

त्यांच्या कामात त्यांना मदत करायला. पण मग माझ्या शाळेचं काय?"

" तू दिवसभर नाही जायचं बाळा नदीवर. सकाळी लवकर नदीवर जायचं तासभर वा फारतर दोन तास बाबांना मदत करायची. त्यानंतर घरी येऊन कपडे बदलून शाळेला पळायचं आणि तसंच संध्याकाळी शाळा सुटल्यावर तासभर जायचं नदीवर

" पण मग मी शाळेचा अभ्यास कधी करायचा?" विनूने उपप्रश्न जोडला. आता या संवादात दामोदरराव म्हणजेच विनूचे बाबा सामील झाले. अन म्हणाले. " तू दप्तर घेऊनच नदीवर यायचं नदीच्या काठावर स्मशानाच्या शेजारी मृताच्या नातेवाईकांना बसण्यासाठी जागा आहे तिथे वेळ मिळेल तसा अभ्यास करायचा"

" वेळ मिळेल तसा... म्हणजे?"

" म्हणजे रोजच काही तुला नदीवर डुबकी मारावी लागणार नाही तुला. जेंव्हा दोन-दोन तीन-तीन दिवस एकही मयत होत नाही अशा वेळी फार काही मिळत नाही नदीच्या चिखलात. तेंव्हा मी तुला पाण्यात उतरवणार नाही. पण जेंव्हा मयत होऊन नदीत त्याची राख सोडली जाईल तेंव्हा मात्र तुला पाण्यात उतरावं लागेल. शिवाय जेंव्हा खूप दिवस मयत होणार नाही तेंव्हा मीच तुला घरीच थांबायला सांगत जाईल."

विनू काहीच बोलला नाही. मग त्याची आई त्याच्याजवळ आली. आणि त्याच्या पाठीवरुन हात फिरवत म्हणाली. " बाळा एकदा सुमीच्या ऑपरेशनपूरते पैसे जमले ना? मग नाही पाठवणार तुला असल्या कामाला मग तू तुझा शिक. मोठा हो."

" पण आई मी फक्त संध्याकाळी कामावर गेलो तर नाही का चालणार? सकाळी झोपेतून उठवत नाही अन खूप खूप गारठाही असतो गं तेंव्हा"

मग दामोदरराव विनूला समजावत म्हणाले " का अरे

बाळा बऱ्याचदा संध्याकाळी प्रेतांना अग्नी दिला जातो. अन मढ्याची शय्या व त्यांचं सामान नदीत ~~सोडलं~~ पहाटे सोडलं जातं त्याचं वेळेस सोनं नाणं अन पैसे मिळण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे एखाद्या दिवशी जास्त अभ्यास दिलेला असेल तर त्यावेळी संध्याकाळी नाही आलास तरी चालेल पण पहाटेला जर तू नित्यनेमाने आलास तर सूमीच्या ऑपरेशनपूरते पैसे आपण लवकरात लवकर जमा करू शकू. आणि हो आपण काय कुणाचे नोकर आहोत का? की कुणाला बांधील आहोत? एखाद्या वेळी खूप कंटाळा आला किंवा परीक्षा वगैरे असली तर माझ्यासोबत नदीवर यायला सूट."

मग पुन्हा विनूची आई विनूची उमेद वाढविण्यासाठी पुन्हा त्याच गोष्टीवर जोर देत म्हणाली, "आणि तूला हे फक्त सूमीचं ऑपरेशन होईपर्यंतच करायचं आहे. नंतर बाबाच्या आणि माझ्या कमाईवरही आपण आरामात राहू शकू."

तसं अगदीच घरची परिस्थिती कळणार नाही इतका लहान हा विनू नव्हताच, आणि खूप आयूष्य कळलयं इतका मोठाही नव्हता. तो अजून अल्लड वयात होता. एवढं मात्र खरं की त्याच्या वयाच्या मानाने तो फारच समजदार होता. त्याचही मन सूमी साठी तीळ तीळ तूटायचं. रोज सोबत खेळणारी बागडणारी भांडणारी सूमी अचानक अंथरूणाला खिळली त्याचा त्यालाही धक्का बसला होता. आणि आता घरात हुंदडणारी सूमी एकाएकी नाहिशी झाल्या सारखी अंथरूणाला खिळल्याने तो कावराबावरा झाला होता. रोज मस्ती करणाऱ्या सूमीला एकदा अचानक खोकला सूरू झाला छातीत दूखायला लागलं आणि फफ्फूसाजवळ वा हृदयाजवळ कुठेतरी एक छिद्र आहे असं डॉक्टर म्हणाले.. अन सूमी तेंव्हा पासून अंथरूणाली

खिळली ती खिळलीच. तेंव्हा पासून जेंव्हा जेंव्हा विनू घरी असायचा तेंव्हा तेंव्हा तो सूमीच्या उशाशी बसून असायचा. तो गृहपाठ वा अभ्यासही सूमीच्या खाटेशेजारी बसूनच करायचा. त्यालाही मनापासून वाटायचं सूमीने लवकरात लवकर बरं व्हावं पून्हा पहिल्यासारखं खेळावं बागडावं. पण तिला नेमकं काय होतयं आणि ती कशी बरी होईल कधी बरी होईल हे समजण्याएवढा मात्र तो मोठा नव्हता. त्यालाही आई वडिलांची तारांबळ कळत होती. पण आता मित्रांसमवेतच्या खेळण्याला मौजमजेला पायबंद बसणार याची जाणिव त्याला झाल्याने त्याचं मनं काहीसं कोमेजलं होतं. पण समजदार शामूने ती परिस्थिती स्वीकारली, अन देवाला प्रार्थना केली की लवकरात लवकर सूमीच्या ऑपरेशनएवढे पैसे गोळा होऊ दे. म्हणजे सूमीही बरी होईल आणि त्याचीही या कष्टप्रद कामातून सूटका होईल.

झालं, नवा दिवस सुरु झाला विनूच्या आयूष्याने आता नवे वळण घेतले होते. विनू आता रोज सकाळी व संध्याकाळी बाबांच्या मदतीसाठी नदीवर जाऊ लागला. स्मशान घाटावर बांधलेल्या पायऱ्यावर तो आपले कपडे काढून ठेवत असे. एक मोठी चाळणी घेवून कमरेएवढ्या छातीएवढ्या पाण्यात तो डुबकी मारत असे. अर्थात डुबकी कुठे कुठे मारायची याची माहिती त्याला बाबांनी दिलेली होती. डुबकी मारुन मोठ्या रुंद चाळणीमध्ये राख-रेती माती चिखल गाळ खडे दगड असं काहीतरी भरुन वर येत असे. मग चाळणीतल्या राखेच्या गाळात तो चाचपून बघायचा त्यात कधी एखाद दूसरं नाणं सापडायचं तर कधीतरी एखादा सोन्याचा मनीही. मग तो काठावर येई आणि तेथे ठेवलेल्या पिशवीत ते नाणं वा सोन्याचा मनी काय मिळेल ते तो टाकत असे. कधी कधी चार पाच डुबक्या मारुनही एकही नाणं गवसायचं नाही तेंव्हा मात्र त्याची फार चिडचिड व्हायची

आणि ते काम त्याला नको-नको वाटायचे पण जेंव्हा जेंव्हा चाळणीत भरून आलेल्या रेतीत एखादा सोन्याचा मनी सोन्याचा तार वा तत्सम वस्तू गवसायची तेंव्हा विनूला फार-फार आनंद व्हायचा. नवी उम्मेद वाटायची. मग तो पुन्हा नव्या जोमाने नव्या उत्साहाने पाण्यात डुबकी मारायचा. त्या पैशाचा हिशेब लावून आणि सापडलेल्या सोन्याची किमत अंदाजे आई-बाबांना विचारून तो मनोमन मोजणी करत राहायचा. कालपर्यंत एवढे जमा झाले होते आज एवढे झाले. आणखी एवढे झाले की झालच काम आपलं. नंतर नंतर जमा झालेले पैसे, सापडलेलं सोनं नाणं मोडून आलेले पैसे, अगरबत्तीच्या आईच्या धंद्यातून गोळा झालेले पैसे त्यातून घरखर्च आणि सुमीच्या औषधाचे पैसे वजावट करून उरलेले पैसे. बचत झालेले असा हिशेबच त्याने पहिल्या दिवसापासून एका वहीत मांडायला सुरुवात केली होती. ती वही तो नेहमी आपल्या दप्तरात ठेवायचा. मध्ये मध्ये तो हिशेब वही उघडून बघायचा.

त्याच्यापुढे आता एवढेच लक्ष्य होते. की सुमीच्या ऑपरेशनपुरते पैसे जमवणे. त्यामुळे त्या आकडेमोडीकडे त्याचे लक्ष लागून होते. रोज सकाळी छान साखरझोपेत असतांना आई-किंवा बाबा त्याला झोपेतून उठवत तो क्षण विनूसाठी फार कष्टप्रद होता. तो डोळे चोळत चोळत उठायचा अन अगदी जड जड पावलाने बाबांच्या मागोमाग नदीची वाट धरायचा, नदीच्या काठावर गेल्यावर अंगावरचे कपडे काढून पहिलं पाऊल नदीत टाकतांनाही त्याच्या अंगावर काटा यायचा. त्या थंडगार पाण्यात अंग झोकून देणं असह्य व्हायचं आणि मनाचा ठाम निश्चय करून तो स्वतःला त्या पाण्यात झोकून द्यायचा. एक दोन डुबक्या झाल्यावर मात्र त्या

गारठ्याचा सराव होऊन जायचा मग सुसह्य वाटायचं पण बऱ्याचदा अभ्यासासाठी रात्री उशिरापर्यंत जागून सकाळी लवकर उठल्याने त्याची पूर्ण झोप होत नसे. त्यामुळे वर्गात अनेकदा त्याला डुलकी येई. एक दोनदा तर त्याला सरांनी "जा तोंड धुवून ये" असं सांगून वर्गाबाहेरही पाठवलं होतं. अशाच दैनंदिनी मध्ये विनू दिवस मागे टाकत होता. वहीतला बचतीचा आकडा कधी कासवाच्या गतीने तर कधी सशाच्या गतीने पुढे सरकत होता. आणि अंतिम ध्येय ही त्याच वेगाने जवळ जवळ येत होतं.

एके दिवशी रात्री विनूला स्वप्न पडलं की त्याला नदीतल्या गाळात खूप सोन्याचे दागिने सापडले आहेत. आणि ते विकून खूप पैसा त्यांच्याकडे आला. त्या पैशात सुमीचं ऑपरेशन होऊन ती बरी झाली. मग आई विनूला म्हणते "बाळा उद्यापासून तुला नदीवर जाण्याची काहीही आवश्यकता नाही, आता तू फक्त शाळा शिक". हे ऐकून सुमीचे हात हातात घेऊन विनू नाचू लागतो अन तितक्यात त्याला जाग येते. जाग आल्यावर हे स्वप्न होतं याची जाणिव झाल्याने तो काहीसा उदास होतो. आणि आपली हिशोबाची वही उघडून पाहतो. तर अजून निम्मा पल्ला गाठायचायं असं त्याच्या लक्षात येतं. 'हरकत नाही आणखी जोमानं काम करु अन उरलेले पैसेही गोळा करु' असा तो स्वतःलाच हुरूप देण्याचा प्रयत्न करतो.

विनू नदीवर जायला लागल्यापासून घरात इतर खर्चातही काटकसर केली जात होती. त्यामुळे पैसे बचतीच्या गाडीने आता बऱ्यापैकी वेग घेतला होता. पण अचानक विनूचे बाबाच आजारी पडले. आणि जवळपास आठवडाभर विनूला एकट्यालाच नदीवर जावं लागलं. तेव्हा प्रत्येक डुबकी सरशी काही पैसे मिळाले की विनूला वाटे "बाबा असते तर आणखी पैसे मिळाले असते. पण आलिये ती वेळ स्वीकारल्याशिवाय गत्यंतर नाही हे विनूने जाणून घेतलं आयुष्यातला हा संघर्ष आहेच

समजदार असणाऱ्या विनूला आणखी समजदार बनवत होता. बाबांच्या आजारपणात त्यांच्या उपचारासाठी थोडे बहूत पैसे खर्च झाले त्यामुळे हिशेबाची वहिही थोडी बहूत कुरकुरली. पण विनूने उम्मेद सोडली नाही. आपली दैनंदिनी नियमित चालूच ठेवली. या वर्षाच्या सर्व चाचण्यांमध्ये विनूचा गूणांचा टक्काही घसरला होता. पण थोड्याच दिवसात हे सगळं दिव्य पार पडणार असल्याने तो फारशी फिकीर करत नव्हता. शिवाय या सगळ्या खस्ता खाल्ल्यामुळे आपली प्रिय बहिण वाचणार आहे या गोष्टीची जाणिव त्याला ऊर्जा पुरवत असे. विनू रोज रात्री अभ्यास करायला सुमीच्या उशाशी बसायचा आणि मधून मधून तिच्या डोक्यावरून प्रेमाणे हात फिरवायचा. विनूलाही सुमीचं दुःख बघवत नसायचं पण त्याच्या बालमनाची समजूत घालायला हिशेबाची वही तेवढी उपयोगी पडायची.

असेच दिवस जात राहीले विनूची दिनक्रमा-चालूच होती. हिशेबाची वही कधी रखडत-खूरडत तर कधी धावत पळत पुढे-पुढे जात राहीली. विनूचा उत्साह आता शिगेला पोहोचला होता. दामोदररावांनीही डॉक्टरांची भेट घेवून ऑपरेशन संदर्भात हालचाली सुरु करण्याचा विचार केला होता. आणि अचानक दोन दिवस झाले चार दिवस झाले आठ दिवस झाले. एकही मयत स्मशानात येईना झाले. नदीत डुबकी मारुनही हाताला आता काहीच सापडत नव्हते. हिशेबाच्या वहीतल्या शिल्लक आहे तिथे स्तब्ध झाली होती. अशा अवस्थेत नदीकाठावर बसलेला विनू अस्वस्थ होवू लागला होता. त्याची चीड-चीड होवू लागली होती "साले लोक मरत का नाहीत" असा मनोमनी विचार करण्यापर्यंत त्याची मजल गेली होती. पण त्याने स्वतःला सावरले आपल्या जिव्हाळ्यातल्या एक जीव वाचवण्यासाठी

Scanned with CamScanner

दुसऱ्या जीवांच्या मरणाची आस लागून राहणं हे काही बरोबर नाही याची जाणिव विनूला झाली. आणि त्याने मनोमन परमेश्वराची माफी मागितली. आता पंधरा दिवस झाले असतील एकही मयत स्मशान घाटावर आले नाही. त्यामुळे विनूचे बाबा आता विनूला ~~पैसे~~ घरी पाठवून देत असत कारण नदीवर कामच राहिलं नव्हतं. घरी राहायला मिळत असूनही विनू मात्र काहिसा अस्वस्थच होता कारण त्याला आस लागून राहिली होती ती ऑपरेशनच्या पैसापुर्तीची आणि आता इतक्या जवळ पोहचूनही लक्ष्य साध्य होत नसल्याने तो ~~बे~~ बेचैन झाला होता.

असेच काही दिवस सरल्यानंतर शाळेतून घरी येताना ~~दोन~~ प्रेत एकाच वेळी स्मशानात आलेले त्याला दिसले. तो मनातून आनंदून गेला. आणि उद्या आपण लवकर येवून नदीत डुबकी मारायचे असे त्याने ठरवून टाकले. ~~दुसऱ्या~~ ~~कि~~ ~~ह~~ याच विषयावर रात्री त्याची बाबांसोबत चर्चाही झाली. ~~आ~~ आता आपलं लक्ष्य पूर्ण होणार या आनंदातच तो रात्री झोपी गेला.

दुसऱ्या दिवशी विनूला जाग आली तेव्हा त्याचे बाबा अजून झोपलेलेच होते. त्याने बाबांना न उठवता ~~उठ~~ खुंटीवर अडकवलेली चाळणि होतली पिशवी होतली आणि नदीचा रस्ता धरला. बाबांच्या आधी नदीवर येण्याची विनूची ही पहिलीच वेळ होती. विनूने अंगावरचे कपडे काढले चाळणी घेतली आणि पाण्यात पाय ठेवला. आजही पाणी नेहमी प्रमाणे थंडगार होते. पण त्याला त्या ~~ची~~ थंडाव्याची ~~ब~~ फारशी वेदना जाणवली नाही. बाबांनी सांगितलेल्या नेमक्या जागेवर विनूने डुबकी मारली. आणि राखेचा चिखल चाळणित भरुन वरती आला त्यात काही एक दोन नाणी त्याला गवसली. त्यानेच अशाच तीन चार डुबक्या मारल्या. अन बाहेर येवून त्यात जे मिळाले ते पिशवी भरत गेला. ~~आ~~ अन एका डुबकिला जेव्हा तो बाहेर आला तेव्हा

त्या गाळातून
तो गाळ चाचपण्याआधीच त्याला कसलासा दागिना वरती आलेला दिसला. त्याने मोठ्या हुरूपाने तो उपसून वर काढला. तर सोन्याचं भलं मोठं गंठणच विनूच्या हाताला लागलं. विनूचे डोळे चमकले. तो आनंदाने उड्या मारू लागला. त्याने आभाळाकडे पाहून परमेश्वराचे आभार मानले. एवढा मोठा सोन्याचा दागिना आता सगळं भागेल. संपलं एकदाचं दुष्टचक्र संपलं आता सुमीचं ऑपरेशन होऊनही आणखी पैसे उरतील. आईला किती आनंद होईल बाबांना किती आनंद होईल. विनूच्या आनंदाला आता पारावार उरला नाही त्याच आनंदात तो पाण्याबाहेर आला. अजून बाबा आले नव्हते. त्यांना एवढा उशीर कधीच होत नसे पण या सगळ्या गोष्टीकडे विनूचं लक्षच नव्हतं. कधी एकदा धावत जाऊन हा दागिना आईच्या हातात देतो असं त्याला झालं होतं. त्याला नदीच्या काठावरची पिशवी अन चाळणी उचलण्याचीही भान राहिलं नाही. तसं त्याने कसे बसे अंगावर कपडे चढवले आणि तशाच ओलेत्या अंगाने घराकडे धावत सुटला. घर जसंजसं जवळ येत होतं तसतसा त्याचा वेग वाढत होता. आता त्याला धाप लागली होती. तसाच धापा टाकत दागिना मूठीत धरून तो धावत होता. दम लागलेल्या अवस्थेत तो घराजवळ आला अंगणात आला आणि थबकला. कितीतरी वेळ निस्तब्ध.... निशब्द... उभा राहिला. उंबरठा ओलांडायची त्याची शक्तीच हरवून गेली. दारात आजूबाजूची माणसे गोळा झाली होती, ~~स~~ आणि रडण्याचा कर्कश आवाज घुमत होता. ~~व~~ विनूने टाचा उंच केल्या तर सुमीला मधोमध झोपवलेले होते आणि तिच्या तोंडावर पांढरे वस्त्र ओढलेले त्याला दिसले.

Scanned with CamScanner

विनूला पाहताच त्याच्या आईने विनूच्या गळयाला मिठी मारली. आणि हमसून हमसून रडायला लागली "सकाळी सूमीला अंथरुणातून उठवायला गेले अन आपली ताई उठलीच नाही बाळा" असं म्हणून आईने हंबरडा फोडला. विनू सूमीच्या शेजारी बसला आणि त्यानेही अश्रूंना वाट मोकळी करुन दिली. दिवसभर सर्व सोपस्कार पार पडेपर्यंत तो सूमीच्या जवळच बसून होता. आता रडून रडून तो थकून गेला होता. त्याच्या डोळ्यातले अश्रू सुकले होते.

अश्रूंच्या नदीत डुबकी मारावी असा तो काळाकुट्ट दिवस सरत सरत गेला. दिवस पश्चिमेला कलला. उन्हे उतरणीला लागली. सगळे ~~पाव्हणं~~ पै पाहूणे येऊन आले संध्याकाळ होताना सूमीला सगळ्यांनी त्याच स्मशानभूमीत आणलं. शंकाची, चाळणी अन नाणे गोळा करायची पिशवी नदीच्या काठावर अजून तशीच होती. ती पाहून विनूच्या काळजात कालवा कालव झाली. कुण्या तरुण पोरांनी पटापट खड्डा खोदला माती बाहेर काढली एक वृद्धाने खड्यात उतरुन अंदाज घेतला. सूमीला त्यात ठेवलं माती लोटताना विनूने तो हातात ठेवलेला डागिना मातीसोबत खड्यात ढकलून दिला.

दिवस सरला रात्र सरली विनू उठला आज नदीवर जायचे नव्हते. आन्हिके उरकले त्याने दप्तर घेतलं दप्तरातून हिशेबाची वही बाजूला काढली त्या वहीतली बरीच पाने अजून कोरीच होती. ती वही विनूने उदबत्ती लावलेल्या सूमीच्या फोटोमागे सरकवून दिली. दप्तर पाठीला अडकवून तो शाळेला निघाला. शाळेची वाट नदीजवळून जात होती. विनूने नदीकडे पाहीले. ती तशीच नेहमीप्रमाणे शांत वाहत होती. विनूने ~~[illegible]~~ सदऱ्याने डोळे पुसले अन पुढची शाळेची वाट तो तुडवू लागला.